# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हायला जग उत्सुक असल्याचं 19 व्या रोजगार मेळयात पंतप्रधानांचं प्रतिपादन, देशातल्या 51 हजार युवकांना सरकारी नियुक्तीपत्रांचं वितरण
- 'क्वाड' परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी आलेल्या अमेरिकी परराष्ट्र मंत्री रुबियो यांच्यासोबत डॉक्टर जयशंकर यांची बैठक
- आगामी काळात भारत हा संरक्षण साहित्याच्या संदर्भात निर्यातक्षम असलेला देश होणार – केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचं प्रतिपादन
- आणि
- आयपीएल क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्जचा लखनौ सुपर जायंट्सवर विजय.

**पंतप्रधान**

भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हायला जग उत्सुक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. देशानं आपल्या कर्मयोगींवर विश्वास ठेवला असून आता त्यांच्या समर्पण, आचरण आणि दैनंदिन कृतींद्वारे त्या विश्वासाला जागणं आणि तो अधिक दृढ करणं ही त्यांची जबाबदारी आहे, असं पंतप्रधानांनी 19 व्या रोजगार मेळ्याला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करताना सांगितलं. तरुणांना संधी, रोजगार आणि जागतिक ओळख उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं सरकार विविध देशांबरोबर भागीदारी करत आहे. शाश्वत ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण केल्या जात आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. हा रोजगार मेळा देशभरातल्या 47 ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. देशभरातून निवडलेले 51 हजार नवनियुक्त उमेदवार, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय तसंच उच्च शिक्षण विभाग यांसारख्या विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये रुजू होणार आहेत.

महाराष्ट्रात नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत काल रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं तर पुण्यात राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तिपत्रांचं वितरण करण्यात आलं.

**जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस इथं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. बैठकीत प्रादेशिक आणि जागतिक शांतता तसंच सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांसह विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

'क्वाड' परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी अमेरिकी परराष्ट्र मंत्री रुबियो काल चार दिवसांच्या दौऱ्यावर भारतात दाखल झाले. त्यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि संरक्षण, सामरिक तंत्रज्ञान, व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा सुरक्षा, कनेक्टिव्हिटी, शिक्षण आणि दोन्ही देशांमधील जनतेतील परस्पर संबंध यांसारख्या विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्यात झालेल्या सातत्यपूर्ण प्रगतीची माहिती दिली. भारत आणि अमेरिका जागतिक हितासाठी एकत्रितपणे काम करत राहतील, असं मोदी यांनी यावेळी सांगितलं. शांतता प्रयत्नांना भारताचा सातत्यपूर्ण पाठिंबा असल्याचं सांगून संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे संघर्षांचं शांततापूर्ण निराकरण करण्याच्या आवाहनाचा पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला.

रुबियो यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीसह विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर अमेरिकेचा दृष्टिकोन मांडून भारताला अमेरिकेचा एक महत्त्वाचा भागीदार असल्याचं म्हटलं. क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या 26 मे ला होणाऱ्या बैठकीत परराष्ट्र मंत्री डॉक्टर जयशंकर, ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्री पेनी वोंग, जपानचे परराष्ट्र मंत्री तोशिमित्सू मोटेगी आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो सहभागी होतील.

**<u>शिर्डी</u>**

संरक्षण साहित्याच्या बाबतीत आत्तापर्यंत आयात करणारा देश म्हणून देशाची ओळख होती, परंतु आगामी काळात भारत हा संरक्षण साहित्याच्या संदर्भात निर्यातक्षम असलेला देश होणार आहे असं प्रतिपादन राजनाथसिंह यांनी केलं.  महाराष्ट्रात शिर्डी इथल्या सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते.

नवीन युगाचा हा शंखनाद असून, संरक्षण क्षेत्रातील खाजगी भागीदारी सध्याच्या 30 ते 35 टक्क्यांवरून आगामी काळामध्ये 50 टक्क्यांपर्यंत नेणार असल्याचं राजनाथ सिंह यांनी सांगितलं. कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच इतर मान्यवर उपस्थित होते.

**<u>पियुष-गोयल</u>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल उद्यापासून भारतीय उद्योगपतींच्या शिष्टमंडळासह तीन दिवसीय कॅनडा दौऱ्यावर जाणार आहेत. व्यापार, गुंतवणूक आणि C-E-P-A अर्थात भारत-कॅनडा सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार वाटाघाटींना गती देण्यासाठी गोयल ओटावा आणि टोरोंटो इथं द्विपक्षीय बैठका घेतील, अशी माहिती वाणिज्य मंत्रालयानं दिली आहे. या कराराच्या नियम आणि अटींवर या वर्षी मार्चमध्ये कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या भारत दौऱ्यादरम्यान स्वाक्षरी करण्यात आली होती. वाटाघाटींची पहिली फेरी मार्चमध्ये दूरस्थ पद्धतीनं पार पडली तर दुसरी फेरी 8 मे रोजी संपली.

या दौऱ्यादरम्यान, ओटावा इथं वाटाघाटींची पुढील फेरी आयोजित केली जाईल. 2023 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 70 अब्ज कॅनेडियन डॉलर्सपर्यंत वाढवण्याच्या सामायिक महत्त्वाकांक्षेसह, दोन्ही देश या वर्षाच्या अखेरपर्यंत एक संतुलित आणि परस्पर फायदेशीर C-E-P-A करार लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दिशेनं काम करत आहेत.

**<u>NBEMS</u>**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जेपी नड्डा यांनी आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांसोबतच डॉक्टर आणि वैद्यकीय तज्ज्ञांचं प्रशिक्षण तितकंच महत्त्वाचं असल्याचं सांगितलं. नवी दिल्ली इथं आयोजित 'नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस'च्या 23 व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. डॉक्टर हे आरोग्य व्यवस्थेचे 'सॉफ्टवेअर', तर रुग्णालयं आणि सुविधा 'हार्डवेअर' असल्याचं त्यांनी नमूद केलं. नवोदित

तज्ज्ञांची कौशल्ये आणि समर्पण देशातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ‘विकसित भारत’ आणि ‘निरोगी भारत’ संकल्पना साकारण्यात वैद्यकीय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असल्याचंही त्यांनी सांगितलं. कार्यक्रमात 26 हजारांहून अधिक उमेदवारांना विविध वैद्यकीय पदव्या प्रदान करण्यात आल्या.

**EDUCATION MINISTRY**

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागानं नवी दिल्ली इथं ‘साकुरा विज्ञान कार्यक्रम 2026’साठी निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या पथकाला हिरवा झेंडा दाखवून निरोप दिला. या उपक्रमांतर्गत 15 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील सरकारी शाळांमधील 56 विद्यार्थी आणि 4 पर्यवेक्षक 30 तारखेपर्यंत जपान दौऱ्यावर असतील. विद्यार्थ्यांमध्ये 24 मुलं आणि 32 मुलींचा समावेश आहे. हे विद्यार्थी ‘राष्ट्रीय आर्थिक निकष-आधारित गुणवत्ता शिष्यवृत्ती योजने’अंतर्गत निवडले गेले आहेत. भारतासोबत घाना, नायजेरिया आणि दक्षिण आफ्रिका येथील विद्यार्थीही या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. Japan Science and Technology Agency तर्फे राबविण्यात येणाऱ्या या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक संशोधनाची आवड निर्माण करणं आणि जपानच्या प्रगत विज्ञान-तंत्रज्ञानासह सांस्कृतिक वारशाची ओळख करून देणं हा आहे.

**V-B-G-RAM-G**

केंद्र शासनानं विकसित भारत G RAM G अधिनियम, 2025 अंतर्गत, नियमांचा मसुदा व्यापक जनपरामर्शासाठी प्रकाशित केला आहे. कोणतीही व्यक्ती, संबंधित भागधारक, संस्था किंवा संघटना या नियमांवर आपले आक्षेप अथवा सूचना, पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत सादर करू शकतात, असं ग्रामीण विकास मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. विकसित भारत G RAM G कायदा, 2025' ची अधिसूचना या महिन्याच्या 11 तारखेला जारी करण्यात आली असून, 1 जुलै 2026 पासून तो सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू होईल.

**MANIPUR-UNC**

यूएनसी अर्थात युनायटेड नागा कौन्सिलच्या सहा सदस्यीय शिष्टमंडळानं मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बीरेन सिंग यांची भेट घेऊन राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीवर चर्चा केली. बैठकीत उपमुख्यमंत्री लोसी डिखो, गृहमंत्री गोविंददास कोंथौजम आणि नागा आमदार उपस्थित होते. UNC नं कांगपोकपी जिल्ह्यातील कोन्साखुल इथून अपहरण झालेल्या सहा नागा गावकऱ्यांचा शोध घेण्याची मागणी केली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाचा तपास NIA कडे सोपविण्यात येणार असल्याचं सांगितलं. 14 मेपासून शोध मोहीम सुरू असल्याची माहिती देत, ओलीस ठेवलेल्या 14 कुकी नागरिकांच्या सुटकेसाठी सहकार्य करण्याचं आवाहनही त्यांनी UNC ला केलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, लखनौ इथल्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर काल रात्री पंजाब किंग्जनं, कर्णधार श्रेयस अय्यरच्या नाबाद 101 धावांच्या जोरावर, लखनौ सुपर जायंट्सचा 7 गडी राखून पराभव केला. लखनौ सुपर जायंट्सनं विजयासाठी ठेवलेल्या 197 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना, पंजाब किंग्जनं 18 षटकांत 3 गड्यांच्या मोबदल्यात 200 धावा केल्या.

स्पर्धेत आज दोन सामने होणार असून पहिला सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात दुपारी साडे 3 वाजता सुरू होईल. तर कोलकाता इथल्या ईडन गार्डन्सवर

दुसऱ्या सामन्यात, कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात लढत होईल. हा सामना संध्याकाळी साडे 7 वाजता सुरू होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज उत्तरेकडील काही राज्यं तसंच विदर्भाच्या काही भागांत तीव्र उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे. बिहार, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, पंजाब, राजस्थान तसंच तेलंगणातील काही ठिकाणीही अशाच प्रकारची हवामान स्थिती राहण्याची शक्यता आहे. आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या काही भागांत आज मुसळधार पावसाचा अंदाज असून दक्षिणेकडील काही राज्यांसह ईशान्य भारताच्या काही भागांत तसंच बिहार, जम्मू आणि काश्मीर, लडाख, कोकण आणि गोवा इथं आज विजा आणि मेघगर्जनेसह वादळाचा अंदाज आहे.

**या बरोबरच हे ऱाष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**